।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

**Phone: (02462) 215294** **EXAMINATION DEPARTMENT** **Website: srtmun.ac.in**

**email : directorboee@srtmun.ac.in**


संदर्भ : परीक्षा /२०२२-२३/१९ दिनांक : ०५/०४/२०२२

## महत्वाचे परिपत्रक

उन्हाळी-२०२२ परीक्षेकरीता पदवी व पदवयुत्तर परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत
विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सूचना.

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान, पदवी व पदव्युत्तर अव्यवसायीक सर्व अभ्यासक्रम, मॉडेल कॉलेज, हिंगोली, उपकेंद्र लातूर, उपकेंद्र परभणी, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट व प्रस्तूत विद्यापीठ संकुल यांना कळविण्यांत येते की, उन्हाळी-२०२२ च्या परीक्षा हया लेखी पध्दतीने **(Pen & Paper)** दीर्घोत्तरी प्रश्नपत्रिकेद्वारे घेण्यांत येणार आहेत. प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२२ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र भरण्याची सूचना खालील प्रमाणे आहे.

CGPA PATTERN चे सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देण्यांत आलेल्या परीक्षेच्या ३ संधी संपलेल्या असल्यामुळे केवळ CBCS अभ्यासक्रमानुसारच परीक्षा होणार आहेत. त्यामुळे CBCS अभ्यासक्रम लागू होण्यापुर्वीच्या सर्व अभ्यासक्रमातील एक किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सध्या चालू असलेल्या CBCS अभ्यासक्रमानुसार सर्व विषय घेवून (प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाचे) परीक्षा आवेदनपत्र भरणे अनिवार्य आहे.

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख ;

अ. नियमित शुल्कासह दिनांक ०६/०४/२०२२ ते १९/०४/२०२२.

ब. नियमित परीक्षा शुल्क व रू.१००/- विलंब शुल्क यासह महाविद्यालयामध्ये अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक २०/०४/२०२२ ते दिनांक २३/०४/२०२२.

क. दिनांक २५/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२ पर्यंत नियमित व विलंब शुल्कासह प्रती दिवस रू. ५०/- अतिविलंब शुल्क आकारून परीक्षा आवदेनपत्र केवळ परीक्षा विभागातच स्विकारले जातील, असे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाने स्विकारू नयेत. या तारखेनंतर विद्यार्थ्यांचे विलंब शुल्काचे परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात पाठवू नयेत.

ड. अतिविलंब शुल्कासह परीक्षा आवेदनपत्र परीक्षा विभागात पाठवितांना अशा विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयामध्ये ठेवावी व अशा विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण व इतर गुण वेळेत परीक्षा विभागाकडे पाठवावेत.

०२. महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/NEFT/RTGS अभ्यासक्रम निहाय जसे की BA, B.Com, B.Sc असे विद्याशाखानिहाय मा. वित्त व लेखा अधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे काढावा. तो धनाकर्ष/NEFT/RTGS दिनांक २५/०४/२०२२ किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असणे आवश्यक आहे. अथवा IDBI बॅकेच्या खात्यामध्ये NEFT/RTGS व्दारे दिनांक २५/०४/२०२२ पर्यंत भरणा करावा. धनाकर्ष किंवा NEFT/RTGS विहीत तारखे नंतर काढल्यास १० दिवसा पर्यंत प्रतीदिन रू. ५००/- तर १० दिवसानंतर प्रतीदिन रू. १०००/- विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**NEFT** द्वारे परीक्षा शुल्क भरताना अभ्यासक्रमनिहाय भरावे; अन्यथा परीक्षा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा शुल्काचा धनाकर्ष/**NEFT/RTGS** कोणत्याही परिस्थतीत अतिरिक्त काढू नये, तसे केल्यास अतिरिक्त असलेली रक्कम इतरत्र वर्ग केली जाणार नाही.

**Bank details for NEFT/RTGS/Online Payment :**
**Name of the A/C holder–Finance & Accounts Officer, S.R.T.M. University, Nanded.**
**Name of Bank : IDBI Bank, Nanded.**
**IFSC Code : IBKL0000500 A/C Number 500104000028422**

०३. वरीलप्रमाणे सर्व अभ्याक्रमांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्यात येतील त्यासाठी दिनांक २५/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२ या दरम्यान ऑनलाईन लिंक चालू राहील. परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंटआउट काढून दोन प्रति मध्ये परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावी.

महाविद्यालयांनी परीक्षा आवेदनपत्र व विहीत शुल्काचा धनाकर्ष विद्यापीठात सादर करण्याचे वेळा पत्रक खालील प्रमाणे राहील. विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रतीदिन रू. २/- किंवा रू. १०००/- या पैकी जे जास्त असेल तो विलंब शुल्क आकारण्यात येईल.

..... २ .....

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख | आवेदनपत्र सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | १०१ ते १२१ | २९/०४/२०२२ | प्रस्तूत विद्यापीठ |
| ०२ | नांदेड | १२२ ते उर्वरीत सर्व | ३०/०४/२०२२ | प्रस्तूत विद्यापीठ |
| ०३ | परभणी | २०१ ते २२१ | २९/०४/२०२२ | उपकेंद्र परभणी |
| ०४ | परभणी | २२२ ते उर्वरीत सर्व | ३०/०४/२०२२ | उपकेंद्र परभणी |
| ०५ | हिंगोली | २०१ ते २२१ | २९/०४/२०२२ | न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली |
| ०६ | हिंगोली | २२२ ते उर्वरीत सर्व | ३०/०४/२०२२ | न्यू मॉडेल कॉलेज,हिंगोली |
| ०७ | लातूर | ३०१ ते ३२१, | २९/०४/२०२२ | उपकेंद्र लातूर |
| ०८ | लातूर | ३२२ ते उर्वरीत सर्व | ३०/०४/२०२२ | उपकेंद्र लातूर |

०४. परीक्षा आवेदनपत्राचे शुल्क रू. ०५/- अतिरिक्त आकारण्यांत यावे.

०५. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत पोष्टाने किंवा अन्य मार्गाने पाठवलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०६. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी स्वतंत्र परीक्षा आवेदन पत्र भरण्यात यावे. तसेच नियमित व बॅकलॉग विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्राचे स्वतंत्र गठ्ठे बांधण्यात यावेत.

०७. परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना प्रथम नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र त्यानंतर अनियमित विद्यार्थ्यांच परीक्षा आवेदनपत्र या प्रमाणे वर्गनिहाय सादर करावेत.

०८. परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना महाविद्यालयाने अभ्यासक्रम निहाय विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांची यादी व विद्यापीठ मान्यता प्रत जोडणे आवश्यक आहे.

०९. परीक्षा आवेदन पत्र अग्रेषीत करताना संबंधीत विषयास संलग्नीकरण चालू आहे काय याची खात्री करूनच परीक्षा आवेदनपत्र सादर करावेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता संलग्नीकरण शुल्क भरलेले असल्याबाबत हमीपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१०. जुन्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र भरतांना चालु शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमानुसार समकक्षता दिलेली असल्यास त्यानुसार तपासणी करून परीक्षा आवेदनपत्र भरण्यांत यावेत. अभ्यासक्रमनिहाय समकक्ष विषयांची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यांत आलेली आहे.

११. उन्हाळी-२०२२ परीक्षेसाठी परीक्षा शुल्क हे मागील शैक्षणिक वर्षा प्रमाणेच आहे. त्यात वाढ करण्यांत आलेली नाही.

१२. तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाकरीता परीक्षा आवेदनपत्र सादर करताना प्रथम वर्षाच्या उत्तीर्ण गुणपत्रिकेची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१३. BA & BSc (Theory + MCQ) ï III Sem अभ्यासक्रमासाठी परीक्षेच्या तीन संधी संपल्यामुळे या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण असलेल्या विषयाची परीक्षा सध्या चालू असलेल्या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे द्यावी लागेल.

१४. व्यावसाईक अभ्यासक्रमांच्या परीक्षा आवेदनपत्र सादर करणे बाबतची सूचना लवकरच प्रकाशीत करण्यंत येईल.

तरी वरील सूचनांची नोंद घेवून ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(डॉ. रवि एन. सरोदे)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-

१. मा.संचालक, लातूर व परभणी उपकेंद्र.
२. मा.प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
३. मा. वित व लेखाअधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहितीस्तव :-

१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सर्व विभाग प्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.